# मी संगीत का शिकतो ?

प्रा. दिपक महादेव जामनिक
एम.ए. संगीत नेट
अशोक मोहरकर कला व वाणिज्य
महाविद्यालय, अडयाळ ता. पवनी, जि. भंडारा
मो.नं. 8552991420

---

मी संगीत का शिकतो ? का बरं मी संगीत शिकावं ! काय गरज आहे संगीत शिकण्याची मला ? संगीत नाही शिकलो तर काय होईल ? का म्हणून संगीत शिकावं ? जर मी संगीत शिकलो नसतो तर काय झालं असतं ? हे जाणून घेण्याआधी संगीत काय आहे हे पाहणे फार आवश्यक आहे. त्यानंतर मी संगीत का शिकतो हे सांगावसं वाटतं !

1) संगीताची व्याख्या :- "गायन वादन, नृत्य हया तीनही समुहाला संगीत असे म्हणतात, "गायन, वादण, नृत्य हे तिनही भाग वेगवेगळे असले तरी ते एकमेकांशी निगडीत आहेत. कारण की, गायन हे वादनाशिवाय आणि वादन हे नृत्याशिवाय वेगवेगळे राहू शकत नाही म्हणून नुसतं गायण करणे त्यांच्यामधून तर रस निघतोच. परंतु त्याच्यामध्ये वादण जर असेल अधिक रस निघेल व अधिक मनाला आनंद देईल आणि गायन वादन ही दोन्ही कृत्ये जर असतील तर नृत्य करायला अधिक आनंद होईल व मनाला सुध्दा शांती प्राप्त होईल. म्हणून गायन, वादण आणि नृत्य ही तिनही भाग वेगवेगळे असले तरी ते एकच आहेत. परंतु संगीत मी का शिकतो हे पुढीलप्रमाणे पाहू.

2) स्वस्थ शरीर राहण्यासाठी :- मानव हा समाजशिल प्राणी आहे. मानव हा समाजशिल प्राणी आहे. मानव हा शिक्षीत असो की अशिक्षीत असो. प्रत्येक मानवाच्या जीवनामध्ये संगीत आहेच आणि आजच्या हया आधुनिक काळामध्ये एवढ प्रदुषण वाढलेले आहे की, त्याचा परिणाम मानवावरच नाही तर पर्यावरणावर सुध्दा पडलेला आहे म्हणून मानवाचे शरीर हे अधिकाधिक बिघडत चाललेले आहे तर त्याकरीता स्वास्थ शरीर ठेवण्यासाठी प्राणायम तर करावाच लागतो. त्याचबरोबर प्राणायाम करतावेळेस संगीत ऐकणे सुध्दा गरजेचे आहे. प्राणायाम करतेवेळेस जर संगीत ऐकले तर अधिक प्रमाणात प्राणायाम चांगला होऊ शकतो. म्हणून संगीत शिकणे आवश्यक आहे.

3) मनाच्या शांतीसाठी संगीत :- मानवाच मनं हे भटकत असत. म्हणजेच चलबिचल असतं. कधी आई आपल्यावर काही कारणावरून आपल्यावर रागावते, कधी बाबा, कधी ताई, तर कधी भाऊ. त्यामुळे आपल्या मनावर बोलण्याचा वेगळाच परिणाम होतो. त्यावेळेस आपले मन शांत करण्यासाठी संगीत ऐकणे फार आवश्यक आहे. कारण संगीत अशी दवा आहे की, त्या दवेसारखी दवा कोणतीच नाही. कोणतेही संगीत आजच्या आधुनिक काळातील रिमीक्स गीत असते. मानवाच्या मनाला शांती दिल्याशिवाय राहत नाही म्हणून संगीत शिकणे आवश्यक आहे.

4) देवीदेवतांना प्रसन्न करण्यासाठी संगीत :- मानव कुठल्याही धर्माचा असो. तो हिंदु असो की, मुस्लीम, जैन, बौध्द, कुठल्याही धर्माचा असो देवीदंवतांची पुजा करतो म्हणजेच भक्ती करतो आणि देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी संगीताचा प्रयोग होतो. देवतांना प्रसन्न करण्यासाठी संगीताचा प्रयोग आजच्या काळातच नव्हे तर प्राचीन काळापासुन चालत आलेली परंपरा आहे देवीदेवतांना प्रसन्न करण्यासाठी संगीताचा प्रयोग तर आपण करतो पण आपल्या मनालाही संगीत शांती देते व मन प्रसन्न राहते.

Research Hub International Journal

5) एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी नेण्याची मुभा :- कुठली वस्तु एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी नेणे फार कठीण काम असतं. कुठल्याही वस्तुच्या बाबतीत घ्या. काही ना काही त्या वस्तुला इजा पोहांचलीच हयांमध्ये काही दुमत नाही परंतु संगीत अशी वस्तु आहे की ती एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी आरामशीर नेवु शकतो आणि आणु शकतो उदा आजच्या आधुनिक काळामध्ये मोबाईल, मोबाईलच्या मेमरीमध्ये एवढे गाणी सामावतात की ज्याचा काही अंत नाही पण त्या गाण्यांना कुठल्याही प्रकारची इजा होत नाही त्यामुळे आपण संगीताला एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी आणु शकतो म्हणजेच एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी नेण्याची मुभा संगीतासारखी कुठल्याच वस्तुमध्ये दिसुन येत नाही.

6) दुस-यांचे मनोरंजन करण्यासाठी :- संगीताची उत्पत्ती ही अतीप्राचीन काळातील झाली आहे आणि संगीत सुध्दा अतीप्राचीन काळापासुन चालत आलेली परंपरा आहे. संगीताचा आस्वाद मानवच नाही तर पुशपक्षी, पर्यावरण सुध्दा घेत असतो. संगीतापासुन कोणीही वंचीतराहलेले नाही. मानव असो की पशुपक्षी प्रत्येक मानवाच्या जिवनामध्ये संगीत आहे ते शास्त्रीय संगीत असो की लोकसंगीत असो काही नाही काही मानव कुठलना कुठल संगीत ऐकत असतो आणि समजून घेत असतो. संगीत शिकत असतांनाच माझ डोक्यात कल्पना आली की संगीत शिकत असतांना स्वत:साठीच संगीत न शिकता दुस-यासाठी शिकावं ही कल्पना आली आणि तेव्हापासून संगीत दुस-यांना ऐकवण्याचे कामाला मी सुरवात केली. मी स्वत:साठीच संगीत शिकत नाही तर दुस-याचे मनोरंजन करण्यासाठी शिकतो आणि संगीत स्वत:ला आनंद देण्यासाठी शिकतो.

7) स्वत:चे पोट भरण्यासाठी :- स्वत:चे पोट भरण्यासाठी प्रत्येक कामे मानवाला करावे लागतात. पोट भरण्यासाठी भारतात विविध प्रकारच्या कला आहेत परंतू सर्वात जर चांगली कला आवडली असेल तर ती संगीत कला आणि आपला व्यवसाय संगीत म्हणून निवडले आणि त्याच्यातच रोजगार कमविण्याचे मार्ग शोधुन काढला. संगीताचे धडे घेण्यास सुरवात केली. आज मी संगीतामध्ये संगीत विशारद आणि एम.ए.पी.एच.डी. अलंकार डिग्री आहेत त्यामुळे आज मला स्वत:चे पोट भरण्यासाठी संगीतामध्ये रोजगार उपलब्ध झाला आहे.

8) स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी :- स्पर्धा ही प्राचीन काळापासुन चालत आलेली आहे. आजच्या आधुनिक काळामध्ये प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आपल्याला दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे संगीताच्या स्पर्धा सुध्दा भारतामध्ये होत असतात आणि त्या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी मी संगीत शिकतो. संगीत स्पर्धेमध्ये विविध प्रकारचे बक्षीसे, कप असतात. आणि ते बक्षीस मिळविण्याची संधी आज मला मिळाली आहे जर मी संगीत शिकलो नसतो तर आज स्पर्धेमध्ये मी भाग घेऊ शकतो नसतो.

9) चित्रपट, नाटक, गाणे, हयांना संगीतबध्द करण्यासाठी :- चित्रपट, नाटक, गाणी, ही प्राचीन काळातील उपज आहे. आधी चित्रपट मुकी होते त्यांना संगीत नव्हते, आवाज नव्हता परंतु अज चित्रपट, नाटक, गाणी हयांना बोलकी करण्यासाठी, संगीतबध्द करण्यासाठी मी संगीत शिकतो. संगीतामुळे नाटकांना, गाण्यांना एक वेगळेपण निर्माण होते. आणि गाण्याची मधुरता, नाटकाची मधुरता वाढते.

सारांश :-

मानवाच्या जीवनामध्ये संगीत नसतं तर मानव हा खुळा झाला असता. आणि मी जर संगीत शिकलो नसतो तर माझे जीवन निरागस झाले असते आणि माझ्या जिवनात कुठल्याही प्रकारचा रस नसतां म्हणून मला शेवटी म्हणावसं वाटत की, मी संगीत कां शिकतो?

संदर्भ सुची :-


- संगीत मेनुअल – डॉ. शर्मा
- संगीत विशारद – वसंत
- भारतीय संगीताचा इतीहास - भागवत शर्मा


Research Hub International Journal